**<u>वादीतर्फे सा.क्र.०२ मोहम्मद ईस्माईल मोहम्मद ईसाक यांचा शपथेवर सरतपास</u>**
**<u>वादीतर्फे श्री.ए.जी. सिद्दीकी वकील यांचेकडूनः-</u>**

**०२-** माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. शपथपत्र नि.क्र.३० वर आहे. आता मला नि.क्र.२२ व २३ दाखविण्यात आले. त्या दोन्ही दस्तांवर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.पी.बी. मुंढे वकील यांचेकडूनः-</u>**

**०३-** वाद मिळकत खरेदीची मिळकत आहे. वादीने २०१८ मध्ये ती मिळकत धनुराम पवार यांच्याकडून खरेदी केलेली आहे. तिने ८२ आर मिळकत खरेदी केली होती. खरेदीखताच्या दिवशी वादीच्या कब्जात ८२ आर क्षेत्र आले. साक्षीदार पुन्हा सांगतो की, वादीने ती २०१३ मध्ये खरेदी केलेली आहे व २०१८ मध्ये प्रतिवादीस विक्री केलेली आहे. मिळकत खरेदी केली त्यावेळेस मोजणी केली होती. त्यावेळेस ८२ आर क्षेत्र भरले होते.

**०४-** हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या पत्नीने जमीनीवर अतिक्रमण झाल्यामूळे दिवाणी दावा क्र.३४/२०१६ दाखल केला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या दाव्यात आमचे असे म्हणणे होते की, आमची जमीन फक्त ७३ आर भरली होती. त्या दाव्यात कोणताही निर्णय झाला नाही, तो प्रलंबीत आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, तो दावा मी दिनांक २५.०४.२०२४ रोजी उचलून घेतलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, त्या दाव्यात कोणतेही अतिक्रमण निघाले नाही म्हणून तो दावा आम्हीं उचलून घेतला.

**०५-** ज्यावेळेस प्रतिवादीस जमीन विक्री केली त्यावेळेस केस प्रलंबीत असल्याची माहीती प्रतिवादीस दिलेली नव्हती. हे म्हणणे बरोबर आहे की, आम्हीं भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन घेतली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, खाजगी मोजणी केली होती.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.23 15:56:02 +0530

**प्रश्नः–** अधिकृतरीत्या ९ आर क्षेत्र कमी असल्याचा पुरावा नसताना तुम्हीं हमीपत्र कसे काय लिहून घेतले.

**उत्तरः–** खाजगी मोजणी केली होती व क्षेत्र कमी भरल्यामूळे लिहून घेतले होते.

**०६–** हे म्हणणे बरोबर आहे की, त्या हमीपत्रात भविष्यात ९ आर क्षेत्राचा ताबा देऊन पैसे घेण्याचे नमुद केलेले आहे. आम्हांला ९ आर क्षेत्राचा ताबा मिळाला नाही.

**प्रश्नः–** तुम्हीं ९ आर क्षेत्राचा ताबा तुकारामला दिला आहे का.

**उत्तरः–** ताबा देण्यापुर्वीच तुकारामने क्षेत्र विकून टाकले आहे.

**०७–** हे म्हणणे बरोबर नाही की, तुकारामने फक्त ७३ आर जमीनच विक्री केलेली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, संपुर्ण सातबारा वरील क्षेत्र विक्री केले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, आम्हीं देखील तुकारामला सातबारा वरील पुर्ण क्षेत्र विक्री केले होते. हे म्हणणे बरोबर नाही की, जेवढे क्षेत्र आम्हीं तुकारामला विक्री केले होते तेव्हढेच क्षेत्र तुकारामने विक्री केले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, ज्यावेळेस आम्हीं तुकारामला ८२ आर क्षेत्राचे खरेदीखत करुन दिले त्यावेळेस आमच्या कब्जात फक्त ७३ आर क्षेत्र होते. आम्हीं त्यांना जमीन मोजून देणार होतो व अधिकच्या क्षेत्राची रक्कम घेणार होतो म्हणून आम्हीं ७३ आर ऐवजी ८२ आर क्षेत्राचे खरेदीखत करुन दिले. हे म्हणणे बरोबर नाही की, मी खोटे व चुकीचे हमीपत्र लिहून घेतलेले आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, आम्हीं हमीपत्रातील मुख्य अट ताबा देणे याचा भंग केलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादीने जमीन विकल्यामूळे आम्हीं त्यांना खोटी नोटीस दिली आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादीवर दबाव आणण्यासाठी व पैसे उकळण्यासाठी हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, दिवाणी दावा क्र.३४/२०१६ मध्ये झालेल्या मोजणीनुसार शेख मौला शेख हकानी यांच्याकडे ९ आर क्षेत्र निघालेले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, त्या मोजणीत माझ्या पत्नीचे एकही गुंठा क्षेत्र कमी निघालेले नाही. हे

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.23 15:56:19 +0530

म्हणणे बरोबर नाही की, बेकायदेशीर रक्कम वसुल करण्यासाठी हा खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, आमची नियत बदलल्यामूळे कराराचा भंग करुन हा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.23 15:56:28 +0530

**( जी.बी. यादव )**,

दि.२३.०४.२०२६

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
गंगाखेड.